


# अभिषेक, तिलक, हार्दिकची तुफानी फटकेबाजी

## भारताच्या विक्रमी धावसंख्या : झिम्बाब्वेचा ७२ धावांनी पराभव

**चेन्नई :** येथे झालेल्या आयसीसी टी-२० विश्वचषकातील सुपर एट्स गट-१ मधील ४८व्या सामन्यात भारताने झिम्बाब्वेवर ७२ धावांनी दणदणीत विजय मिळवला. २६ फेब्रुवारी रोजी रंगलेल्या या सामन्यात भारताने फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही विभागांत सरस कामगिरी करत प्रतिस्पर्ध्यांना पूर्णपणे नमवले.

प्रथम फलंदाजी करताना भारताने २० षटकांत ४ बाद २५६ धावांचा प्रचंड डोंगर उभा केला. सुरुवातीला संजू सॅमसन २४ धावा करून बाद झाला, मात्र त्यानंतर अभिषेक शर्मा आणि ईशान किशन यांनी डाव सावरत वेग कायम ठेवला. अभिषेक शर्माने ३० चेंडूत ५५ धावांची आक्रमक खेळी केली, तर ईशान किशनने २४ चेंडूत ३८ धावा जोडल्या. कर्णधार सूर्यकुमार यादवने फक्त १३ चेंडूत ३३ धावांची तुफानी खेळी करत प्रेक्षकांची मने जिंकली.

डावाच्या अखेरीस हार्दिक पांड्या आणि तिलक वर्मा यांनी झंझावाती फटकेबाजी करत झिम्बाब्वेच्या गोलंदाजांची अक्षरशः धुलाई केली. हार्दिक पांड्या २३ चेंडूत नाबाद ५० धावा ठोकत प्लेअर ऑफ द मॅच ठरला. तिलक वर्माने अवघ्या १६ चेंडूत नाबाद ४४ धावा करत भारताचा धावफलक २५६ पर्यंत नेला. भारताचा धावगती दर १२.८० इतका प्रभावी राहिला.



चेन्नई : अभिषेक शर्मा आणि ईशान किशन यांनी जोरदार फटकेबाजी करत भारताला मोठी धावसंख्या उभा करुन दिली.

### उपांत्य फेरीसाठी वेस्ट इंडिज विरुध्द विजय आवश्यक

रविवार दि. १ मार्च रोजी कोलाकाता येथील ईडनगार्डन स्टेडियमवरील भारताचा सामना वेस्ट इंडिज संघाशी होणार असून उपांत्य फेरीत पोहोचण्यासाठी भारताला हा सामना जिंकणे क्रमप्राप्त असणार आहे.

२५७ धावांच्या प्रचंड लक्ष्याचा पाठलाग करताना झिम्बाब्वेची सुरुवात डळमळीत झाली. तडिवानाशे मरुमानी आणि डायन मायर्स लवकर बाद झाल्याने संघ दबावात आला. मात्र ब्रायन बेनेटने एकहाती झुंज देत ५९ चेंडूत नाबाद ९७ धावांची शानदार खेळी केली. त्याला सिकंदर रझाने २१ चेंडूत ३१ धावांची साथ दिली, पण इतर फलंदाजांकडून अपेक्षित साथ न मिळाल्याने झिम्बाब्वेचा डाव २० षटकांत ६ बाद १८४ धावांवर थांबला.

भारताकडून अर्शदीप सिंगने भेदक गोलंदाजी करत ४ षटकांत केवळ २४ धावा देत ३ महत्त्वाचे बळी घेतले आणि सामना भारताच्या बाजूने झुकवला. वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल आणि शिवम दुबे यांनी प्रत्येकी एक बळी घेतला. जसप्रीत बुमराह आणि हार्दिक पांड्या यांनीही किफायतशीर मारा करत धावांचा वेग रोखला.

या प्रभावी विजयामुळे भारताने सुपर एट्स फेरीत आपली ताकद पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. फलंदाजांची स्फोटक कामगिरी आणि गोलंदाजांची अचूकता यामुळे भारताचा संघ विजेतेपदाच्या दिशेने आत्मविश्वासाने वाटचाल करत असल्याचे या सामन्यातून स्पष्ट झाले. चेन्नईच्या मैदानावर प्रेक्षकांनी भारताच्या दमदार खेळीचा मनसोक्त आनंद लुटला.

## सुपर आठ फेरीची गुणतालिका

### गट १

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| आफ्रिका | 2 | 2 | 0 | 4 | +2.890 |
| विंडीज | 2 | 1 | 1 | 2 | +1.791 |
| भारत | 2 | 1 | 1 | 2 | -0.100 |
| झिम्बाब्वे | 2 | 0 | 2 | 0 | -4.475 |

### गट २

| संघ | सामने | विजय | पराभव | गुण | रनरेट |
|---|---|---|---|---|---|
| इंग्लंड | 2 | 2 | 0 | 4 | 1.491 |
| न्यूझीलंड | 2 | 1 | 0 | 3 | 3.050 |
| पाकिस्तान | 2 | 0 | 1 | 1 | -0.461 |
| श्रीलंका | 2 | 0 | 2 | 0 | -2.800 |

# राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार)च्या राष्ट्रीय अध्यक्षपदी सुनेत्रा पवार

### प्रफुल्ल पटेल यांनी केली घोषणा

**मुंबई :** अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे रिक्त झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी अजित पवार यांच्या पत्नी आणि राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची निवड करण्यात आली आहे. गुरूवारी झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीमध्ये ज्येष्ठ नेते प्रफुल्ल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाची घोषणा केली तसेच सुनेत्रा पवार यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार पक्ष पुन्हा घेईल, असा विश्वासही प्रफुल्ल पटेल यांनी व्यक्त केला.



अजितदादांच्या पश्चात राष्ट्रवादी अजित पवार गटाचं काय होणार, विलिनीकरणाची प्रक्रिया कशी राबवली जाणार याबाबत अनेक सवाल उपस्थित केले जात होते. पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सुनेत्रा पवार यांची पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी निवड झाल्याचा निर्णय जाहीर करण्यात आला.

# दक्षिण आफ्रिकेचा वेस्ट इंडिजवर एकतर्फी विजय

## १७७ धावांचे आव्हान ९ गडी राखून १६.१ षटकातच पार

**अहमदाबाद :** अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर क्रिकेटचा नवा 'महाभारत' रंगला. टी-२० विश्वचषकाच्या सुपर-८ फेरीत दक्षिण आफ्रिकेने वेस्ट इंडिजच्या कॅरेबियन आव्हानाचा अक्षरशः धुराळा उडवला.



क्विंटन डी कॉकने २४ चेंडूत ४७ धावांची खेळी केली.

प्रथम फलंदाजी करताना वेस्ट इंडिजने उभे केलेले १७७ धावांचे लक्ष्य दक्षिण आफ्रिकेने अवघ्या १६.१ षटकांत १ गड्याच्या मोबदल्यात गाठून ९ विकेट्स राखून महाविजय नोंदवला. टॉस जिंकून द. आफ्रिकेने विंडीजला प्रथम फलंदाजीचे आमंत्रण दिले. लुंगी एनगिडी आणि कागिसो रबाडा यांनी सुरुवातीलाच आग ओकली. २९ धावांवर पहिली विकेट पडल्यानंतर विंडीजच्या फलंदाजीचा डोलारा पत्त्याच्या बंगल्यासारखा कोसळला. ७१ धावांत ६ गडी गमावल्यानंतर विंडीजचा संघ शंभरी गाठणार की नाही, अशी चिन्हे होती. मात्र, जेसन होल्डर (४९) आणि रोमॅरियो शेफर्ड (५२ नाबाद) यांनी खिंड लढवली. होल्डरच्या बॅटमधून निघालेल्या ठिणग्यांनी विंडीजला १७६ धावांच्या सन्मानजनक धावसंख्येपर्यंत पोहोचवले. आफ्रिकेकडून लुंगी एनगिडीने ३० धावांत ३ बळी घेत आपली धार सिद्ध केली.

१७७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करायला उतरलेल्या आफ्रिकन सलामीवीरांनी 'आक्रमकता' हाच आपला मंत्र ठेवला. क्विंटन डिकॉकने पहिल्याच चेंडूपासून विंडीजच्या गोलंदाजांवर मानसिक दडपण निर्माण केले. त्याने केवळ २४ चेंडूंच्या आपल्या खेळीत १९५.८३ च्या स्ट्राईक रेटने ४७ धावा कुटल्या. डिकॉकने मारलेले ४ चौकार आणि ४ गगनभेदी षटकार हे विंडीजच्या खेळाडूंचे मनोधैर्य खच्ची करण्यासाठी पुरेसे होते. त्याच्या या झंझावातामुळे आफ्रिकेने पॉवरप्लेच्या ६ षटकांतच १ बाद ६९ धावांचा डोंगर उभा केला. 'कॅप्टन कूल'चे नाबाद वादळ डिकॉक बाद झाल्यानंतर कर्णधार एडन मार्करामने मैदानाचा ताबा घेतला. सुरुवातीला संयम दाखवल्यानंतर त्याने आपल्या फटक्यांची धार वाढवली.



वेस्ट इंडिजच्या खेळाडूला बाद केल्यानंतर आनंद व्यक्त करताना कार्बिन बॉश व सहकारी.

मार्करामने विंडीजच्या फिरकी आणि वेगवान अशा दोन्ही गोलंदाजांना लक्ष्य केले. त्याने अवघ्या ४६ चेंडूत ८२ धावांची नाबाद खेळी साकारली. या खेळीत त्याने मैदानावर चौफेर फटकेबाजी करत ६ चौकार आणि ४ षटकार ठोकले. विशेषतः त्याने मारलेले कव्हर्स ड्राइव्ह आणि पूल शॉट्स पाहण्यासारखे होते. मार्करामने १६.१ व्या षटकात विजयी धाव घेत आफ्रिकेच्या विजयावर शिक्कामोर्तब केले. या दरम्यान त्याला रायन रिकल्टनने भक्कम साथ दिली. रिकल्टनने आपल्या २८ चेंडूंच्या खेळीत नाबाद ४५ धावा केल्या. त्याने ४ चौकार आणि २ षटकार खेचत मार्करामला दुसऱ्या टोकाकडून पूर्ण स्वातंत्र्य दिले.

### उपांत्य फेरीच्या दिशेने आफ्रिकेची आगेकूच

अहमदाबादच्या खेळपट्टीवर दक्षिण आफ्रिकेने ज्या सहजतेने हा विजय मिळवला, त्यावरून त्यांनी आपल्या प्रतिस्पर्ध्यांना धोक्याचा इशाराच दिला आहे. वेस्ट इंडिजच्या ७१-६ अशा विदारक अवस्थेनंतर होल्डरने केलेले पुनरागमन विंडीजला आशा देऊन गेले होते, पण आफ्रिकेच्या फलंदाजीने त्या आशांचे 'रण' मैदान केले. या विजयासह दक्षिण आफ्रिकेने गुणतालिकेत आपले स्थान अधिक भक्कम केले असून, उपांत्य फेरीचे तिकीट पक्के केले आहे.

पान १ वरुन

## बार्शी 'आऊट अक्कलकोट 'ईन'

जिल्हाध्यक्षपदाचा मान देण्यात या तालुक्याचं नाव सध्या तरी भाजपच्या गोटात काही अंशी बाजूला पडल्याचं पक्षाच्या सुत्रांकडून सांगण्यात आलं. तर जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी यांच्याबाबतीत नकाराचं होकारात रूपांतर होऊ शकतं अशी खात्रीलायक माहितीही सुत्रांकडून मिळाली.

दरम्यान जिल्हा परिषद आणि पंचायत समित्याचे पदाधिकारी निवडीचा कार्यक्रम जाहीर होण्याच्यादृष्टीने पालकमंत्री जयकुमार गोरे आणि आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्याकडून चाचपणीला सुरुवात होईल. नवा जिल्हाध्यक्ष आणि नवे पंचायत समित्यांचे सभापती निवडण्यावरुन मोर्चेबांधणी होईल, अशीही माहिती पुढं आली आहे.

विशेषत्वे, बार्शी तालुक्यात भाजपचं निर्विवाद वर्चस्व आल्यानं जिल्हाध्यक्षपदाचा मान या तालुक्याला दिला जाईल, अशा चर्चांचा तसेच तर्क व अंदाजांचा धुराळा उठला आहे. मात्र या तालुक्यावर हुकमत आणलेल्या माजी आमदार राजेंद्र राऊत यांना विधान परिषदेची आमदारकी देण्यासंदर्भात त्यांचं नाव आघाडीवर येणं तसंच मंत्री चंद्रकांत पाटील यांचं राऊत यांना आमदाकीदेण्याबाबतीमधील भाष्य आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी खुद्द राऊत यांची निकटवर्तीता या सगळ्यांचाच परिपारक म्हणून राजेंद्र राऊत यांच्या नावावर विधान परिषद आमदाकीची मोहर उमटू शकते, असं खात्रीलायक सांगण्यात आलं.

राजेंद्र राऊत यांना विधान परिषदेवर संधी देऊन भाजपनं बळ देण्याचा निर्णय घेतल्यास त्यांच्या बार्शी तालुक्याकडं जिल्हा परिषद अध्यक्षपद देणं संयुक्तिक होणार नाही, असं पक्षाच्या श्रेष्ठींना वाटतं किंबहुना त्यांची तशी भूमिका सध्या तरी आहे. त्यातून राऊत यांच्या समर्थक भारती दराडे आणि दीपक वैद्य या दोघांची नावं जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी मागं पडू शकतात.

दुसऱ्या बाजूला आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या नेतृत्वाचा अक्कलकोट तालुक्यासह भाजपच्या विस्ताराच्यादृष्टीनं सोलापूर शहरासह जिल्ह्यात चौफेर उधळणारा अश्व लक्षात घेता, त्यांच्या सौभाग्यवती शांभवी यांच्या गळ्यात जिल्हा परिषद अध्यक्षपदाची वरमाला पडू शकते, असंदेखील ठामपणे सुत्रांनी सांगितलं. आमदार कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी कल्याणशेट्टी यांनी आपली जिल्हा परिषद अध्यक्ष होण्याची इच्छा नाही,' असं सांगितलं असलं तरी त्यांच्या नकाराचं रुपांतर होकारामध्ये होऊ शकतं.

### पक्षाचा आदेश अन् सचिनदादांच्या 'होकारा'चा पूर्वानुभव

सोलापूर जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदाबाबत आमदार सचिन कल्याणशेट्टी यांच्या पत्नी शांभवी यांनी नकार दर्शवला आहे. शांभवी यांचा नकार म्हणजे आमदार सचिन कल्याणशेट्टींचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष नकार असा अर्थ याप्रकरणी घेतला जातो. मात्र कल्याणशेट्टी हे पक्षाचा आदेश मानणारे कार्यकर्ते आहेत. व्यक्ती पेक्षा पक्ष मोठा असं ते नेहमी सांगतात. कल्याणशेट्टी यांच्याबाबतीत सोलापूर महापालिका निवडणुकीचं उदाहरण पुढं केलं जात आहे. नुकत्याच झालेल्या सोलापूर महापालिकेच्या निवडणुकीवेळी सचिन कल्याणशेट्टींना निवडणुकीचं प्रभारी म्हणून निवडलं होतं. त्यावेळी त्यांनी जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुकीचं कारण पुढं करत नकार दिला होता. अशातही दुसऱ्या बाजूला कल्याणशेट्टी यांनी नकारातच होकाराची भूमिका उत्तमपणे बजावली होती. उमेदवार निवडणं, पक्षाच्या अधिकृत उमेदवारीचा एबी फॉर्म देणं, विरोधकांशी संघर्ष करत एबी फॉर्म जमा करणं, प्रचार यंत्रणा आणि एकूण मोर्चेबांधणी आदी सगळं प्रभारीपदाच्या जबाबदारी पीचच्या पुढं जाऊन केलं होतं. हे उदाहरण लक्षात घेता, कल्याणशेट्टींचा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडीवेळी नकारात होकार येऊ शकतो.

### भाजपचा पहिला-वहिला अध्यक्ष कोण? बीजेपी कार्यकर्त्यांमध्ये सामिष भोजनासह रोख रकमेच्या शर्यती

सोलापूर जिल्हा परिषदेच्या ६८ जागांपैकी तब्बल ३८ जागा भारतीय जनता पक्षाने प्रथमच जिंकल्या आहेत. आतापर्यंत कमळाच्या चिन्हावर निवडून आलेला सदस्य जिल्हा परिषदेचा अध्यक्ष होऊ शकलेला नाही, त्यामुळे भाजपला इतिहासात पहिल्यांदा आपला अध्यक्ष बसविण्याची संधी मिळणार आहे, त्यामुळे भाजपचा जिल्हा परिषदेचा पहिला अध्यक्ष कोण होणार, याची मोठी उत्सुकता जिल्ह्यात आहे. दरम्यान जिल्हा परिषद अध्यक्षपदाची वरमाला नेमकी कोणाच्या गळ्यात पडणार? यावरुन बीजेपी कार्यकर्त्यांमध्ये सामिष भोजनासह रोख रकमेच्या शर्यती लागल्याचं सांगण्यात आलं.

### 'या' मुळं आमदार कल्याणशेट्टींचं पारडं जड

आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी अक्कलकोट मतदारसंघात येणाऱ्या जिल्हा परिषदेच्या नऊपैकी सात, तर पंचायत समितीच्या १८ पैकी १४ जागा जिंकल्या आहेत. तत्पूर्वी अक्कलकोट आणि मैंदर्गी नगरपरिषदाही जिंकल्या आहेत, त्याशिवाय जिल्हाध्यक्षांपासून ते आजवर सोलापूर जिल्ह्यात भाजप वाढवण्यात त्यांचे भरीव योगदान आहे. त्यामुळे कल्याणशेट्टी यांचे पारडे निश्चितपणे जड आहे.

## उजनीचे पाणी उमराणी बंधाऱ्यात अडवले

मंद्रूपसह आठ गावांच्या पिण्याचा पाणीपुरवठा बंद पडला आहे. याबाबत प्रशासनाने सरकारकडे बोट दाखवल्याच्या लोकप्रतिनिधी व शेतकऱ्यांच्या तक्रारी आहेत. सहा फेब्रुवारी रोजी उजनीतून भीमा नदीत चार हजार ४०० क्युसेक पाणी सोडण्यात आले. मात्र, कर्नाटकने त्यांच्या उमराणी बंधाऱ्यात पाणी अडवले आहे. त्यामुळे हे पाणी खाली पोचू शकले नाही. परिणामी लवंगी, पाटीलनगर, कारकल, औज, कुरघोट, टाकळी, बरूर, चिंचपूर येथील पिके धोक्यात आली आहेत.

भीमा नदी कोरडी पडल्याने शेतीचा पाणीपुरवठा थांबला आहे. तर मंद्रूपसह या गावांतील पिण्याच्या पाण्याचा पुरवठाही बंद पडला आहे. याबाबत मंद्रूपसह परिसरातील शेतकऱ्यांनी लोकप्रतिनिधी व जिल्हा प्रशासनालाही निवेदन दिले आहे. परंतु अद्याप उमराणी बंधाऱ्यातून पाणी खाली न सोडल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत.

दरम्यान, कर्नाटकने उजनी धरणाचे पाणी अडवल्याने सोलापुरचे लोकप्रतिनिधी देखील आक्रमक झाले आहेत. पाणी अडवल्याने प्रशासनाने उजनीतून पाणी सोडणे थांबवले आहे. त्यामुळे सादेपूरखालील गावांतील ग्रामस्थ व शेतकऱ्यांच्या मोठ्या प्रमाणात तक्रारी येत आहेत. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्याकडे पाठपुरावा सुरू आहे. जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत केला, मात्र तो होऊ शकला नाही. खाली पाणी सोडण्यासाठी प्रयत्न सुरु असल्याची माहिती भाजप आमदार सुभाष देशमुख यांनी दिली आहे.

## चर्चेंचे गुऱ्हाळ; आघाडीत तू-तू,मैं-मैं...

या प्रमुख नेत्यांसह झालेल्या या बैठकीत काँग्रेस नेत्यांनी राजकिय समीकरणांवर भर दिल्याचे सांगण्यात येते.

राज्यसभेत काँग्रेसचे संख्याबळ वाढवणे ही काळाची गरज असून, राष्ट्रीय स्तरावर पक्षाची ताकद मजबूत करण्यासाठी ही जागा काँग्रेसलाच मिळावी, असा पवित्रा पक्षाने घेतला. ही जागा काँग्रेससाठी प्रतिष्ठेची असल्याचेही नेत्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे दोन्ही पक्षाने त्यांची बाजू मांडली . दोन्ही पक्ष आता त्यांच्या भूमिकेवर ठाम आहेत. त्यामुळे आता याबाबत काय निर्णय घेतला जाणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

या बैठकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाच्या नेत्यांनी शरद पवार यांच्या प्रदीर्घ अनुभवाचा मुद्दा उपस्थित केला. शरद पवार हे देशातील ज्येष्ठ नेते असून, राष्ट्रीय पातळीवर पक्षाची ताकद आणि प्रभाव कायम ठेवण्यासाठी त्यांनाच उमेदवारी मिळणे आवश्यक आहे, असे मत राष्ट्रवादीच्या नेत्यांनी मांडले. शरद पवार यांची या संदर्भातील वैयक्तिक इच्छा काय आहे, हे जाणून घेतल्यानंतरच राष्ट्रवादी काँग्रेस आपली अंतिम भूमिका जाहीर करणार आहे.

### एका जागेवरून वाद

२८८ सदस्यांच्या विधानसभेत भाजपाकडे १३१, शिवसेनेकडे ५७ व राष्ट्रवादीकडे ४० आमदार आहेत. या बळावर सत्ताधारी युती सहा जागा बिनविरोध जिंकू शकते. दुसरीकडे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे)- २०, काँग्रेस- १६ व राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार)- १०, असे प्रत्येक पक्षाकडील आमदारांचे संख्याबळ आहे. या तिघांनी एकजूट दाखवली, तर एका जागेसाठी आवश्यक असलेला आकडा महाविकास आघाडी सहज पार करू शकते. प्रत्योक उमेदवाराला विजयासाठी ३७ मतांची गरज आहे.